# पुस्तक परीक्षणे

## केवळ (तीन) नोंदी!

टिळक-आगरकर, गांधी-नेहरू जन्मालाच यावे लागतात... आणि त्यांचीच जीवनचरित्रं अखेर इतिहासाच्या पुस्तकांची पानं व्यापून टाकत असतात. खालच्या फळीतली काही कर्तृत्ववान, मध्यमवर्गीय माणसंही आपल्या परीनं आयुष्यभर समाजासाठी काही करण्याच्या प्रयत्नात असतात. तीही अखेर इतिहासाच्या पुस्तकात नसलं तरी परिशिष्टात निश्चितच स्थान मिळवतात. बाकी कोट्यवधी जनसामान्यांची इतिहास दखलही घेत नसतो !

**—परिशिष्ट, (पृष्ठ १८५)**

अशोक प्रभाकर डांगे यांच्या ४२६ पृष्ठांच्या जाडजूड कादंबरीची मध्यवर्ती कल्पना सांगणारं हे वाक्य. पण आपल्याला वाचायला मिळतं, ते १८४ पानं आपण पार करू शकलो तरच ! तोपर्यंत आपण या तीन अंकी कादंबरीतले 'पहिले परिशिष्ट' पूर्ण करून 'दुसऱ्या परिशिष्टा'त प्रवेश केलेला असतो. आपल्या हाती मात्र काहीच आलेलं नसतं.

मराठी कादंबऱ्यांच्या इतिहासात अरुण साधू यांनी 'मुंबई, दिनांक... सारखी कादंबरी लिहून, आपल्याला पार गुरफटवून टाकणाऱ्या राजकीय आणि सामाजिक घडामोडींचा वेध एक पत्रकार कसा घेऊ शकतो, याचं लक्षणीय दर्शन घडवलं. त्यानंतर चळवळीतल्या चारचौघांना कादंबरीतली प्रमुख पात्रे बनवून त्यांच्यामार्फत गेल्या ३०-३५ वर्षांतल्या सामाजिक-राजकीय घडामोडींवर भाष्य करण्याची एक लाटच मराठी साहित्यात आली. या लाटेत लिहिल्या गेलेल्या अनेक कादंबऱ्यांसारखीच 'परिशिष्ट' ही एक. पण साधुंच्या 'मुंबई, दिनांक...'चा आपल्यावर पगडा नाही, हे दाखविण्याच्या डांगे यांच्या सततच्या प्रयत्नामुळे ती पूर्णपणे पोकळ आणि तकलादू पायावर तर उभी राहिलीच शिवाय एखाददुसरा अपवाद वगळता यातील सर्व व्यक्तिरेखाही पार कचकड्याच्या बाहुल्या बनल्या.

साधुंच्या कादंबरीत मुख्यमंत्री, कामगार नेता, पत्रकार आणि एक सामान्य मध्यमवर्गीय मुंबईकर अशा चार ठळक व्यक्तिरेखा आहेत. त्यांच्या आयुष्यातल्या एका विशिष्ट दिवशी घडलेल्या साऱ्या घडामोडींची गुंफण अत्यंत कुशलतेने करताना लेखकानं महाराष्ट्रात, विशेषतः मुंबईत सामान्य माणसाची कशी ससेहोलपट होऊ शकते याचं प्रभावी चित्रण केलं आहे. सामाजिक आणि राजकीय चळवळीत मैलाचे दगड ठरू शकतील, अशा व्यक्तिरेखांना त्यांनी आपली पात्रं बनवलं आणि एकाच दिवसाच्या वेगवान घटनाक्रमातून समाजातील एकूणच किडलेली 'व्यवस्था' आणि 'मूल्यांचा ऱ्हास' यांचं दर्शन घडवलं.


### आशय निसटून गेला

'परिशिष्ट' ही कादंबरी हातावेगळी केल्यावर लक्षात येतं की, डांगे यांनाही नेमकं हेच करायचं आहे. पण आपण 'मुंबई, दिनांक...'च्या प्रभावाखाली नाही, हे दाखविण्याच्या प्रयत्नात त्यांना नाना क्लृप्त्या योजाव्या लागल्या आणि त्यासाठी तंत्राच्या नाना करामती करताना कादंबरीतला आशय पार हातातून निघून जाताना बघत बसावं लागलंय.

एका दिवसाची डायरी. त्या दिवशी मुख्यमंत्री जिवाजीराव शिंदे, कामगार नेता डिकास्टा, पत्रकार अय्यर यांच्यासारख्या समाजातल्या मान्यवरांना आलेले अनुभव हे साधुंच्या कादंबरीचं वैशिष्ट्य. अशोक प्रभाकर डांगे यांनी आपली कादंबरी 'दैनंदिनी' पद्धतीनं लिहिलेली नाही. पण त्याऐवजी एक मे १९६८, एक ऑगस्ट १९७५ आणि एक डिसेंबर १९८५ असे तीन दिवस निश्चित करून, त्या तीन परिशिष्टांमध्ये कादंबरी उभारण्याचा आराखडा तयार केला... तो तयार करतानाच इतिहासात ठळक नोंद होऊ न शकणाऱ्या, जेमतेम परिशिष्टातील नोंदीपर्यंत पोचू शकणाऱ्या व्यक्तिरेखांची निवड केली.

### नात्यात गुंतलेली कुटुंबे

बॅरिस्टर व्हायचे सोडून साम्यवादी – समाजवादी – डाव्या चळवळीत शिरून अपयशी ठरलेला आणि पुढे किंचित पत्रकार – लेखक झालेला कॉम्रेड कानिफनाथ बेलसरे, 'समाज' नावाचे एक तथाकथित वैचारिक मासिक चालवून 'विचारवंत' हा किताब स्वतःला लावून घेणारा हिंदुत्ववादी संपादक शरश्चंद्र कुलकर्णी, वृत्तीनं अत्यंत कर्मठ पण प्रत्यक्षात व्यवहारी असलेला संधीसाधू तात्या महाराज इनामदार या तीन व्यक्तिरेखांच्या भोवती ही कादंबरी घोटळत राहते. ही तीन पात्रे आणि तात्यामहाराज इनामदारांच्या 'समर्थ सदन'मध्ये राहणारी अन्य कुटुंबे ही सारी या ना त्या नात्याने एकमेकांमध्ये गुंतलेली आहेत. ६८, ७५ आणि ८५ या वर्षांतल्या त्या तीन दिवशी सामाजिक-राजकीय क्षेत्रात घडणाऱ्या ठळक घटनांचे ते निव्वळ गॅलरीतून बघणारे प्रेक्षक नाहीत. तर कोणत्या त्या ना कोणत्या स्तरावर ही सारी मंडळी त्या घडामोडींमध्ये सहभागीही झालेली आहेत. तरीही या घटनांचे वर्णन केवळ वर्तमानपत्री बातमीदारीच्या पातळीवर आणि विश्लेषण उपनगरी रेल्वेतील चर्चांच्या स्तरावरच शिल्लक उरते.




### महत्त्वाचे दिवस

ऐतिहासिक दृष्टीनं खूप महत्त्वाची नसली तरी सामाजिक दृष्टीनं उपयुक्त कामगिरी करण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या मध्यमवर्गीयांच्या जीवनाचे चित्रण करण्याच्या प्रयत्नातून आपण या कादंबरीच्या संकल्पनेपर्यंत आल्याचा उल्लेख लेखकानेच प्रस्तावनेत केला आहे. यासाठी त्याने ६८, ७५ आणि ८५ या तीन वर्षांमधला एक-एक दिवस निवडला. त्या दिवसांनाही काही विशिष्ट अशी पार्श्वभूमी आणि महत्त्व आहे. ६८ मधला दिवस हा 'कामगार दिन' आहे. शिवाय तोच दिवस महाराष्ट्र राज्य स्थापना दिनही आहे. ७५ सालातला दिवस त्या अर्थानं विशिष्ट नसला, तरी त्या सालालाच आपल्या देशाच्या दृष्टीने विशेष संदर्भ आहे. त्याचवर्षी २६ जून रोजी इंदिरा गांधींनी देशात आणीबाणी जारी केली होती. तर 'तिसऱ्या परिशिष्टा'साठी निवडलेल्या एक डिसेंबर १९८५ या दिवसाची निवड पुलाखालून बरेच पाणी वाहून गेल्यानंतरचा एक काळ या अर्थानं झाली आहे. या तीन दिवशी काय-काय घडते, ते सांगताना सारी कादंबरी उभी करण्याचा लेखकाचा प्रयत्न मात्र अपयशी ठरला आहे; कारण कादंबरीतील उपरनिर्दिष्ट तीन महत्त्वाच्या व्यक्तिरेखांभोवतालच्या आणखी किमान २५ पात्रांच्या जीवनातला बारीकसारीक तपशील आणि पूर्वेतिहास डांगे आपल्याला अगदी सरधोपट पद्धतीनं सांगत राहतात आणि मग एकमेकांच्या ओळखीच्या २५-३० माणसांच्या, गेल्या ३० वर्षांतल्या आयुष्यातल्या घटनांची एक गोष्ट एवढ्याच स्तरावर ही कादंबरी जाऊन पोहोचते.

यातूनच मग स्वातंत्र्यपूर्व काळातील आंदोलनं, महाराष्ट्रातील समाजवादी चळवळ, स्वातंत्र्यानंतर फोफावलेली मराठी वृत्तपत्र सृष्टी, आणीबाणी आणि त्यानंतरचा कालखंड एवढा मोठा विस्तीर्ण पट आपल्यापुढे येतो. त्या त्या काळात, काळाच्या गरजेनुसार काही विशिष्ट व्यक्ती तयार होत असतात. अशा व्यक्तिरेखांचे नमुने दाखविणारी काही पात्रेही या कादंबरीत आहेत. शांता शेजवलकर ही त्यापैकीच एक व्यक्तिरेखा. शासकीय अधिकारी, लेखिका, समाजसेविका आणि स्त्रीमुक्तीच्या खंद्या पुरस्कर्त्या– एवढ्या त्यांच्या वर्णनावरूनच महाराष्ट्रातल्या तीन-चार महिलांचे गुणविशेष एकत्र करून हे पात्र लेखकाने निर्माण केले असल्याचे लक्षात येते. कादंबरीतली बहुतेक पात्रनिर्मिती लेखकाने याच पद्धतीने केली आहे. त्यामुळेच विविध क्षेत्रात, वेगवेगळ्या स्तरांवर काम करणाऱ्या व्यक्तींची खिल्ली उडविण्याचा प्रयत्नही त्याला शक्य झाला आहे.

### चटका लावणाऱ्या व्यक्तिरेखा

पण अशाच पातळीवर उभ्या करण्यात आलेल्या एकूण २५-३० पात्रांच्या गदारोळात दोनच व्यक्तिरेखा मनाला चटका लावून जातात. त्यापैकी एक म्हणजे मृणाल. संपादक शरश्चंद्र कुलकर्ण्यांच्या धाकट्या भावाची– श्रीधरची पत्नी. अत्यंत देखणी आणि सर्वांशी प्रेमाच्या ओलाव्यानं वागणारी मृणाल एका असाध्य रोगानं ग्रासली जाते... आणि अखेर आत्महत्या करून मोकळी होते. तिनं आत्महत्या केल्यानंतर शांता शेजवलकरांसह या कादंबरीतल्या अन्य चार-चौघांनी व्होडकाचे घुटके घेत केलेली त्या आत्महत्येची कारणमीमांसा हा एक प्रसंग आजच्या काळात बेफिकीरी आणि बेमुर्वतखोरपणा कसा वाढत चालला आहे, याचं यथार्थ दर्शन घडवतो. या कादंबरीतली आणखी एक लक्षात राहणारी व्यक्तिरेखा इरावतीची आहे. कानिफनाथ ऊर्फ कनुआबा बेलसऱ्यांची ही मुलगी. गावाच्या समाजकारणात गुंतले गेल्यामुळे कनुआबांना मासिक प्राप्ती तशी नसतेच त्यामुळे इरावतीचं लग्न लावून देणंही त्यांना शक्य नसते. मग इरावती डॉ. सरदेशमुखांच्या नादी लागते. प्रेम, स्नेह, जिव्हाळा, मानसिक आधार आणि पुढे शारीरिक गरज या मार्गाने त्यांचे संबंध घनिष्ट होत जातात आणि तशीच दहा वर्षे घालवल्यावर त्यातील सारा फोलपणा इरावतीच्या लक्षात येतो... मग ती एका बिजवराशी लग्न करून मोकळी होते. तिच्या आयुष्याची झालेली परवड काळजाला घर पाडीत जाते.

बाकी मग 'तिसऱ्या परिशिष्टा'त निव्वळ चर्चा आणि परिसंवाद आहेत. 'समाज' मासिक बंद करावे लागण्याच्या निमित्तानं, महाराष्ट्रात एकूणच वैचारिक आणि चिंतनशील मासिकं का चालत नाही याची चर्चा तर 'एशियाड आणि कलर टी. व्ही.' हे उल्लेख येताच 'मूल्यांची घसरण-नैतिक अवमूल्यन' असे शब्द वापरून एक ठोकळेबाज परिसंवाद. अशा साऱ्या भरताडीतून ही कादंबरी उभी राहिली आहे.

'परिशिष्ट'ला तशी विशिष्ट कथावस्तू नाही. शिवाय सतरा वर्षांतल्या केवळ तीनच दिवसांचे चित्रण केल्यामुळे कथानकाच्या मांडणीतही काही मर्यादा येत गेल्या, अशी स्पष्ट कबुली लेखक अशोक प्रभाकर डांगे यांनीच प्रास्ताविकात दिली आहे. तरीही मांडणीच्या मर्यादा, पात्रांचा भडिमार आणि एकूणच व्याख्यानबाजीचं लेखकाला असलेलं व्यसन यामुळे इतक्या महत्त्वाच्या कालखंडाचं चित्रण असूनही कादंबरी मनाचा ठाव घेऊ शकत नाही. त्यामुळेच ही कादंबरी 'साहित्याचे मानदंड' ठरू शकणार नाही, पण मराठी साहित्याच्या इतिहासाला जोडल्या जाणाऱ्या 'परिशिष्टा'त मात्र ती निश्चितच स्थान मिळवू शकेल, असे म्हणावेसे वाटते.

**—प्रकाश अकोलकर**


**परिशिष्ट**
**अशोक प्रभाकर डांगे**
**राजहंस प्रकाशन, पुणे**
**पाने : ४२६ / किंमत : रु. १७५.**

# नवं कोरं

## कार्याची पावती

डॉ. श्री. श्री. घारे यांच्या अमृत महोत्सवानिमित्त एक छोटेसे गौरवपर पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. यात विविध थरांतील, नात्यातील व्यक्तींचे घारे यांच्या स्वभावातील पैलू स्पष्ट करणारे लेख आहेत. समाजवादी डॉ. घारे स्वातंत्र्यसैनिक आहेत. इतरांना मदत करण्यासाठी ते सतत धडपड करीत. आशिया खंडात सर्वात श्रीमंत समजल्या जाणाऱ्या पिंपरी -चिंचवड नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदावर काम करूनही ते सर्व तऱ्हेच्या मोहांपासून अलिप्त राहिल्याचा उल्लेख अनेकांनी केलेला आहे. गांधीविचारांचा प्रभाव असल्यामुळे त्यांनी अनेकदा निर्णय-घेताना प्रतिपक्षाला किंवा विरोधकांना कसे प्रेमाने वागविले. हे सांगणारे प्रसंगही अनेकदा आलेले दिसतात.

अंध कल्याण मंडळ, अपंग पुनर्वसन केंद्र, मूक-बधिर विद्यालय, महाराष्ट्र साहित्य परिषदेची पिंपरी -चिंचवड शाखा अशा संस्थांना प्रोत्साहन देणारे, निर्मोही, संयमी, समतेचा कृतिउक्तीतून स्वीकार करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. घारे.



आजच्या भ्रष्ट व्यवस्थेत सचोटीने, जिव्हाळ्याने, सेवाभावी वृत्तीने काम करणारे डॉ. श्री. श्री. घारे यांच्याविषयीचे हे पुस्तक म्हणजे सर्वांनी त्यांच्या कार्याची दिलेली पावतीच होय.

(**डॉ. श्री. श्री. घारे - एक सेवाव्रती**, संपा. : सौ. स्नेहसुधा कुलकर्णी / श्री. माधव सहस्रबुद्धे, प्रकाशक : डॉ. श्री. श्री. घारे अमृत महोत्सव समिती, पुणे. पाने : १००, किंमत : २५ रु.)

## मराठीतील वाक्प्रचार

चंद्रहास जोशी यांचे 'मराठी भाषेतील वाक्प्रचार' हे पुस्तक सन १९१०